# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/02/2024 (शनिवार) दुपार


## (लग्न समारंभात चोरी करणारी टोळी गजाआड
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

फिर्यादी नामे– सपोनी एम. एम. मोकाशे पोस्टे सावनेर यांनी दि. ०९/०२/२०२४ रोजी तकार दिली कि, ते दि. ०९/०२/२०२४ रोजी पोस्टे ला हजर असताना जनता लॉन येथे एक इसम चोरी करण्याच्या उददेशाने संशयीत रित्या फिरत आहे. अशी गुप्त बातमी दारांकडून माहीती प्रमाणे घटनास्थळी पोहचून आरोपी नामे– बिशाल मुकेश सिसोदिया वय २५ वर्ष रा. गुलखेडी, तह. पचोर, जिल्हा राजगढ, राज्य मध्यप्रदेश यास ताब्यात घेवून तो जनता लॉन येथे सुरू असलेल्या लग्न समारंभात आपल्या साथीदारांसह चोरी करण्याचे उददेशाने फिरत असल्याचे खात्री पटल्याने त्याला ताब्यात घेवून त्याचेवर अप क्र. १४७/२४ कलम १२२ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये कार्यवाही करून आरोपी याने आपले साथीदाराचे मदतीने पोलीस स्टेशन खापरखेडा, गिट्टीखदान नागपूर शहर, व पोलीस स्टेशन बुलढाणा शहर, तळेगाव दाबाडे पिंपरी चिंचवड व इतर ठिकाणी लग्न समारंभात लॉन मध्ये चोरी केल्या बाबतचे गुन्हे उघडकिस आणले. ते खालीलपमाणे– १) पोस्ट खापरखेडा अप क्रमांक ६९४/२४ कलम ३७९, ३४ भादवी २) पोस्टे गिट्टीखदान अप कमांक ९०२/२३ कलम ३७९ भादवी ३) पोस्ट बुलढाणा अप क्र. ११६/२४ कर्नल ३७९, ३४ भादवी ४) पोस्ट तळेगाव दाबाडे पिंपरी चिंचवड अप क्र. ४२/२४ कलम ३७९, भांदवि. दाखल असलेले गुन्हे उघडकीस आणुन सदर पोलीस स्टेशला माहिती देण्यात आली. यामुळे नागपूर ग्रामीण तसेच इतर ठिकाणी होणाऱ्या चोऱ्या टाळण्यात आल्या. व गुन्हयाचा पुढील तपास पोहवा सुरेन्द्र वासनिक करत आहेत.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ, सहा पोलीस अधिक्षक अनिल मस्के, सावनेर विभाग नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे सावनेर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर, सपोनि एम. एम. मोकाशे व अंमलदार पोहवा सुरेन्द्र वासनिक यांनी केली.

## नागपूर ग्रामीण पोलीसांनी अवैध्य गोवंश वाहतूक करणाऱ्या आरोपीतांना केले अटक

**पोस्टे खापाः–** दिनांक ०९/०२/२०२४ चे २३.०० वा. ते दिनांक १०/०२/२०२४ ०५.०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन खापा येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारांमार्फत माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन खापा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून जवाहर टि पॉईंट खापा येथे नाकाबंदी केली असता पारशिवणीचे दिशेकडून खापा वस्तीकडे एक महिंद्रा बोलेरो मिनीमालवाहू वाहन क्रमांक MH40 CM 5206 हे येंतांना दिसुन आल्याने सदर वाहनास स्टाफचे मदतीने रोडचे कडेला थांबवुन वाहनाचे डाल्याची तपासणी केली असता वाहनाचे डाल्यामध्ये ०९ काळया रंगाचे लहान हले होते (गोवंश) कत्तलीकरीता आखुड दोराने त्यांचे पायांना बांधून अत्यंत क्रुर व निर्दयतेने वाहनाचे डाल्यात कोंबुन त्याची चारापाण्याची कुठलीही व्यवस्था न केलेल्या स्थितीत दिसून आले. पोलीस स्टाफ यांनी सदर वाहनातील वाहन चालकास नाव विचारले असता त्याने परमाल सुखपाल सनिया वय २४ वर्षे रा. बिछुआ ता. बिछुआ जि. छिंदवाडा

असे नाव सांगीतले. वाहन चालकास विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी सदरची जनावरे कत्तलीकरीता वाहनाचा मालक नामे —सलमान असलम कुरेशी वय ३२ वर्षे, रा. बिछुआ ता. बिछुआ, जि. छिंदवाडा याचे सांगण्यावरुन वाहतुक करीत असल्याचे सांगीतले. आरोपीकडुन ०९ लहान हले (गोवंश) किंमती ५४,०००/—रू. व गोवंश वाहतुकीचे वापरात आणलेली महिंद्रा बोलेरो मिनीमालवाहू वाहन क्रमांक MH40 CM 5206 किमती ५,००,०००/—रू. असा एकुण ५,५४,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीतांविरूद्ध पोस्टे खापा येथे कलम ११(१) (ड) (च) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायदा १९६० सहकलम ५(अ) (१) ५(ब), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ सहकलम १०९ भा.द.वी सहकलम १३०/१७७ मो.वा.का. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक मिलींद गेडाम, सफौ प्रमोद बन्सोड, पोहवा विनोद पाटील, पंकज ठाकुर, पोशि पन्नालाल यांनी पार पाडली. पुढील तपास सफौ प्रमोद बन्सोड हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर